**मे.नवरत्न मॅगनिज प्रॉडक्ट्स एलएलपी या कंपनीद्वारे भूखंड क्र. जे-३४, एमआयडीसी हिंगणा, ता.हिंगणा, जि.नागपूर येथे १००० टन प्रतीमाह मॅगनीज ऑक्साईडच्या विस्तारीकरण उत्पादनासाठी प्रस्तावित प्रकल्पाची दि. ११/०४/२०२५ रोजी घेण्यात आलेल्या पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीचे इतिवृत्त.**

*******

केंद्र शासनाच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाची अधिसूचना दि.१४.०९.२००६ व सुधारीत अधिसूचना दि. ०१.१२.२००९ अन्वये मे.नवरत्न मॅगनिज प्रॉडक्ट्स एलएलपी या कंपनीद्वारे भूखंड क्र. जे-३४, एमआयडीसी हिंगणा, ता.हिंगणा, जि.नागपूर येथे १००० टन प्रतीमाह मॅगनीज ऑक्साईडच्या विस्तारीकरण उत्पादनासाठी प्रस्तावित प्रकल्पाची पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी दिनांक ११/०४/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता एमआयडीसी इंडस्ट्रीज असोशिएशन, एमआयए हाऊस, भूखंड क्र. पी-२६, एमआयडीसी इंडस्ट्रीयल एरिया, हिंगणा रोड, जि.नागपूर-४४००१६ येथे श्री. अनुप खांडे, निवासी उपजिल्हाधिकारी, नागपूर यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. श्रीमती. हेमा देशपांडे, प्रादेशिक अधिकारी, नागपूर हे म.प्र.नि.मंडळाचे प्रतिनिधी तथा लोक सुनावणी समितीच्या सदस्या म्हणून उपस्थित होत्या व श्री. सुशिलकुमार राठोड, उप-प्रादेशिक अधिकारी, नागपूर-२ यांनी समन्वयक म्हणून काम पाहिले. अध्यक्षांच्या संमतीने सकाळी ११.०० वाजता पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीची कार्यवाही सुरू केली. पर्यावरण विषयक लोक सुनावणीच्या वेळी उपस्थित असलेल्या नागरीकांच्या नावांची यादी सोबत जोडली आहे. **(सहपत्र-१).**

## पार्श्वभूमी

मे.नवरत्न मॅगनिज प्रॉडक्ट्स एलएलपी यांनी १००० टन प्रतीमाह मॅगनीज ऑक्साईड उत्पादनासाठी प्रकल्पाचा विस्तार करण्याचे नियोजन केले आहे. प्रस्तावित प्रकल्प विद्यमान प्रकल्प स्थळी भूखंड क्र. जे-३४, एमआयडीसी हिंगणा, ता.हिंगणा, जि.नागपूर, महाराष्ट्र राज्य येथे राबविण्यात येणार आहे.

## प्रयोजन व कार्यपध्दती

उप-प्रादेशिक अधिकारी, नागपूर-२ यांनी अध्यक्षांच्या परवानगीने लोकसुनावणी समितीचे सदस्य व उपस्थितांचे स्वागत करून लोकसुनावणीला सुरवात केली.

सर्वप्रथम मा.निवासी उपजिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जन सुनावणी समिती यांनी जाहिर लोकसुनावणी घेण्याबाबतचा उद्देश व त्याची कार्यपध्दती समजावून सांगितली. त्यानुसार या ठिकाणी प्रकल्पाला परवानगी बाबतचा कोणताही निर्णय घेण्यात येणार नाही असे स्पष्ट केले. या जाहिर लोक सुनावणीमध्ये घेण्यात येणाऱ्या आक्षेपांची नोंद घेणे व शासनास पाठविणे एवढेच काम ही समिती करेल. त्यामुळे उपस्थित जनतेला या प्रकल्पाबाबत त्यांच्या सूचना, टिका, टिप्पणी, निवेदने व आक्षेप घ्यावयाचे असतील तर या ठिकाणी तोंडी अथवा लेखी मांडावयाचे आहेत त्याची नोंद घेतली जाईल व शासनास पाठविण्यात येईल असे सांगितले.

उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, नागपूर-२ यांनी भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाची अधिसूचना क्र. **SO 60 (E) dtd. 27th Jan. 1994** व सुधारणा दिनांक १४ सप्टेंबर, २००६ नुसार लोकसुनावणी घेण्याचे प्रयोजन विशद आहे असे नमुद केले. तसेच त्यामधील तरतुदीनुसार दिनांक ०७/०३/२०२४ ला दैनिक हितवाद (इंग्रजी) व दैनिक लोकमत (मराठी) या दोन मोठ्या प्रमाणात वितरीत होत असलेल्या स्थानिक वृत्तपत्रात या पर्यावरण विषयक लोकसुनावणीबद्दल जाहीर सूचना प्रसिध्द करण्यात आली आहे असे कळविले. वृत्तपत्रांत प्रसिध्द झालेल्या सुचनांच्या कात्रणाची प्रत सोबत जोडली आहे. **(सहपत्र-२).**

..२/-

भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचने प्रमाणे पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तसेच प्रकल्पाची ठळक वैशिष्ठे असलेल्या संक्षिप्त अहवाल (इंग्रजी व मराठी मध्ये) व इतर माहिती असलेले कागदपत्रे विविध सरकारी कार्यालयात तसेच ग्रामपंचायत कार्यालयात ३० दिवसापूर्वी नागरीकांच्या अवलोकनार्थ ठेवण्यात आलेले होते. जाहिर सूचना प्रसिध्द झाल्यापासून जाहिर सुनावणीच्या तारखेपुर्वी परिसरातील लोकांकडून लिखीत स्वरूपात सूचना, टीका-टिप्पणी व आक्षेप मागविण्यात आलेले होते. जाहीर लोकसुनावणीच्या दिवसापर्यंत एकुण १ निवेदन म.प्र.नि.मंडळाकडे प्राप्त झाले असुन प्रत सोबत जोडण्यात येत आहे **(सहपत्र-३)**. मंडळाचा आदेश क्र. ई-१९/२०२५ पत्र क्र. BO/JD/(WPC)/PH/B-230318-FTS-0046 dtd. 18/03/2025 नुसार लोक सुनावणी समिती गठीत करण्यात आली. या आदेशाची प्रत सोबत जोडत आहे **(सहपत्र-४)**.

उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, नागपूर-२ तथा समन्वयक यांनी प्रकल्प धारकाला प्रकल्पाबद्दल व पर्यावरणीय अहवालाबाबत विस्तृत सादरीकरण करण्यास सांगितले. तदनुसार, प्रकल्प धारकाच्या प्रतिनिधीने तपशिलवार मराठी भाषेत १००० टन प्रतीमाह मॅगनीज ऑक्साईड या उत्पादनासाठी पर्यावरण विषयक बाबींबाबत प्रकल्प परिसर, प्रस्तावित प्रकल्पाचे लाभ, प्रस्तावित सुविधा, अग्निशामक सुविधा, प्रक्रियेचे विवरण, वातावरणाची माहिती आणि अपेक्षित परिणामांची पडताळणी, जमिनीवरील घटक, वातावरण व हवामान, हवेतील घटक, परिसरातील हवेचा दर्जा, आपत्ती व्यवस्थापन योजना, हवा प्रदूषणाचे स्त्रोत, ध्वनी घटक, जल घटक, उपलब्ध पाण्याचा दर्जा, पाण्याचा वापर, सांडपाण्याची निर्मिती, जैविक घटक, सामाजिक आणि आर्थिक घटक, स्थानिक मूलभूत सोयीसुविधांवर होणारा परिणाम, पर्यावरण व्यवस्थापन योजना, हवेतील उत्सर्जन, सांडपाणी व्यवस्थापन, वनीकरण कार्यक्रम, काळजी व्यवस्थापन आणि परिक्षण या बाबींवर सादरीकरण केले.

सादरीकरणा नंतर उप-प्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंडळ, नागपूर-२ यांनी उपस्थितांना सदर प्रकल्पाबाबत काही प्रश्न, सुचना, टिका, टिप्पणी आक्षेप सुचवायचे असल्याचे त्यांनी आपले नांव व गावाचे नांव सांगुन मुद्दे उपस्थित करावे, असे आव्हान केले.

**जनसुनावणी दरम्यान चर्चेतील प्रश्न, टीका, टिप्पणी, आक्षेप, सुचना तसेच प्रकल्प धारकाने दिलेली उत्तरे/आश्वासने खालील प्रमाणे आहेत:**

**१) श्री. सुनंदा रेड्डी, पर्यावरण तज्ञ.**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १ | प्रकल्पास समर्थन दर्शविला, रोजगार मिळेल, प्रदूषण नियंत्रणात ठेवावे. हा प्रकल्प औद्योगिक क्षेत्रात असल्याने मोठ्या प्रमाणात परिसरात वृक्ष लागवड करावी व पावसाचे पाणी गोळा करून जलपूर्नभरण (Rainwater Harvesting) उभारावे. प्रकल्पाचे स्वागत आहे.<br>या प्रकल्पास विना अटी व शर्तीसह परवानगी मिळावी. | यावर प्रकल्प प्रवर्तकाने सांगितले की, मोठ्या प्रमाणात परिसरात वृक्ष लागवड करण्यात येईल. तसेच प्रकल्प परिसरातील पावसाचे पाणी गोळा करून जलपूर्नभरण (Rainwater Harvesting) करण्यात येईल. |

**२) श्री. पी.मोहन, अध्यक्ष, एमआयए,नागपूर.**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १ | हा प्रकल्प औद्योगिक क्षेत्रामध्ये असल्याने पर्यावरण विषयक परवान्याची अट वगळावी. प्रकल्पाचे स्वागत केले. | सदर सुनावणी ही पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना दि.१४.०९.२००६ व सुधारीत अधिसूचना दि. ०१.१२.२००९ अन्वये घेण्यात येत आहे. |

**३) श्री. एस.चंद्रशेखर, पर्यावरण तज्ञ, हैद्राबाद.**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १. | प्रकल्पास समर्थन दर्शविला. हरितपट्टा विकसीत करावा, स्थानिकांना रोजगार दयावा व गावांकरीता कॉर्पोरेट सामजिक जबाबदारी घ्यावी (CSR). सांडपाणी संयंत्रणा लावावी व कामगारास सुरक्षा उपकरणे प्रदान करावे. | प्रकल्प प्रवर्तकाने सांगितले की, विद्यमान कारखाना सुरू आहे. विस्तारीकरण प्रकल्पामध्ये स्थानिकांना रोजगारात प्राधान्य देण्यात येईल. तसेच स्थानिकांच्या मुलभूत गरजा लक्षात घेवून कार्पोरेट सामाजिक जबाबदारीच्या अंतर्गत (CSR) त्याची पुर्तता करण्यात येईल. |

त्यानंतर श्रीमती. हेमा देशपांडे, सदस्या, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती तथा प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, नागपूर यांनी प्रकल्प प्रवर्तकास प्रदूषणाबाबत कोणत्या उपाययोजना करणार आहेत. हवा प्रदूषण नियंत्रण यंत्रणेचे काटेकोरपणे पालन करावे, जेणेकरून परिसरातील नागरीकांना त्रास होणार नाही. उद्योगामध्ये कच्चा माल व तयार झालेले उत्पादन हे बंदिस्त खोलीमध्ये ठेवावे. तसेच कोळसा हाताळणी केंद्र व राखेची साठवणूक योग्यरित्या करावी.

यावर प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, प्रदूषणाबाबत अद्यावत हवा प्रदूषण नियंत्रण यंत्रणा बसवनू नियमितपणे दुरूस्ती व देखभाल करण्यात येईल, जेणेकरून परिसरातील नागरीकांना याचा त्रास होणार नाही. तसेच उद्योगामध्ये बाहेरून येणारा कच्चा माल व तयार झालेले उत्पादन उद्योगाच्या परिसरात बंदिस्त खोलीमध्ये ठेवण्यात येईल. तसेच उद्योगामधून निर्माणह होणारी राख ही विट उत्पादकांना विकल्या जाईल.

श्री. अनुप खांडे अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती तथा निवासी उपजिल्हाधिकारी, नागपूर, यांनी प्रकल्प प्रवर्तकास कामगाराच्या आरोग्याबाबत कोणत्या उपाययोजना करणार.

यावर प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, कामगाराच्या आरोग्याबाबत आरोग्य शिबीर राबविण्यात येईल व कर्मचारी राज्य विमा महामंडळामध्ये समाविष्ट करण्यात येईल.

श्री.सुशिलकुमार राठोड, समन्वयक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती तथा उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, नागपूर-२ यांनी उपस्थित जनसमुदायास त्यांचे काही आक्षेप, सूचना व टिका-टिप्पणी असल्यास सांगावे असे आव्हान केले. तसेच जर कुणाच्या लेखी नोंदी असतील त्यांनी समितीकडे जमा करणे किंवा दि.११/०४/२०२५ पर्यंत म.प्र.नि.मंडळ, कार्यालय, नागपूर अथवा जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर येथे जमा करण्याबाबत सुचित केले. उपरोक्त नागरीकांनी सुचित केलेले मुद्दे तसेच प्रकल्प प्रवर्तकांनी दिलेली उत्तरे यांची नोंद घेण्यात आली असून प्राप्त लेखी निवदेनाची सुध्दा नोंद घेण्यात येईल, असे नमुद केले.

..४/-

श्री. अनुप खांडे अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती तथा निवासी उपजिल्हाधिकारी, नागपूर, यांनी सदर प्रकल्पाबाबत उपस्थित नागरिकांच्या प्रश्नांची व प्रकल्प प्रस्तावकांच्या उत्तराची उजळणी केली. तसेच जर कुणाच्या लेखी नोंदी असतील त्यांनी समितीकडे जमा करणे किंवा दि.११/०४/२०२५ पर्यंत म.प्र.नि.मंडळ, कार्यालय, नागपूर अथवा जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर येथे जमा करण्याबाबत सुचित केले. तसेच उपस्थित जनतेचे आभार मानले. त्यानंतर सदर पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी संपली असे जाहिर केले.

(हेमा देशपांडे)
सदस्या, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, नागपूर

(सुशिलकुमार राठोड)
समन्वयक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, नागपूर-२

(अनुप खांडे)
अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
निवासी उपजिल्हाधिकारी, नागपूर